# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

दुरध्वनी क्र.2333536-40, 2348001-05

E-mail - contact@aurangabadmahapalika.org, est1@aurangabadmahapalika.org

जा.क्र.मनपा/साप्र(आस्था-1)/2024/ 2311 दिनांक 08 / 07 /2024.

**सेवानिवृत्त अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत.**

**संक्षिप्त जाहिरात**

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-2715/प्र.क्र.100/13. दिनांक 17/12/2016 नुसार आयुक्त,छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हे खालील या विवक्षित कामाकरिता सेवानिवृत्त अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने घेण्याकरिता पात्र सेवानिवृत्त अधिका-यांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

**1) "छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची अग्निशमन सेवा अधिक प्रभावीपणे राबविणे व त्यावर नियंत्रण ठेवणे तसेच आपत्ती व्यवस्थापनाचे अनुषंगाने आवश्यक कामे करणे"**

**2) मालमत्ता कर वसुलीसाठी स्थापन केलेल्या नियंत्रण कक्षामार्फत वसुली वाढविण्यास व नवीन योजनेच्या अंमलबजावणी साठी सहाय्य करणे.**

संबंधित अधिका-यांनी दि. 22/07/2024 रोजी सकाळी/~~दुपारी~~ 11.00 वाजता लेखी अर्ज व आवश्यक कागदपत्रांसह **मुख्य प्रशासकीय इमारत,छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर** येथे उपस्थित रहावे. उपरोक्त नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येईल. अर्जाचा नमुना, इतर तपशील व अटी/शर्ती www.chhsambhajinagarmc.org या छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर पीडीएफ स्वरुपात उपलब्ध आहे.

ठिकाण : - छत्रपती संभाजीनगर.
दिनांक : - 08 /07/2024

आयुक्त तथा प्रशासक
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

दुरध्वनी क्र.2333536-40, 2348001-05

E-mail - contact@aurangabadmahapalika.org, est1@aurangabadmahapalika.org

बेटी बचाओ save the girl child


जा.क्र.मनपा/साप्र(आस्था-1)/2024/2310 दिनांक 08/07/2024.

**सेवानिवृत्त अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत.**

## जाहिरात

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-2715/प्र.क्र.100/13. दिनांक 17/12/2016 नुसार प्रशासक,छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हे खालील विवक्षित कामाकरिता सेवानिवृत्त अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने घेण्याकरिता पात्र सेवानिवृत्त अधिका-यांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

संबंधित अधिका-यांनी दि.22/07/2024 रोजी सकाळी/~~दुपारी~~ 11.00 वाजता लेखी अर्ज व आवश्यक कागदपत्रांसह **मुख्य प्रशासकीय इमारत,छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर** येथे उपस्थित रहावे. उपरोक्त नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात राहील.

| अ क्र | विवक्षित कामाचे स्वरुप | पद संख्या | अर्हता व प्राधान्य |
|---|---|---|---|
| 1) | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची अग्निशमन सेवा अधिक प्रभावीपणे राबविणे व त्यावर नियंत्रण ठेवणे तसेच आपत्ती व्यवस्थापनाचे अनुषंगाने आवश्यक कामे करणे. | 01 | राष्ट्रीय/राज्य अग्निशमन सेवा महाविद्यालय यांच्याकडील Station Officer & Instructor पाठ्यक्रम (अग्निशमन अभियांत्रिकीमधील प्रगत पदविका) उत्तीर्ण असावा. किंवा राष्ट्रीय / राज्य अग्निशमन सेवा अकादमी, महाराष्ट्र शासन यांचा १ वर्ष कालावधीचा उप स्थानक अधिकारी व अग्निप्रतिबंधक अधिकारी हा पाठ्यक्रम पूर्ण केलेला असावा किंवा The Institution of Fire Engineers (U.K.) किंवा (India) या संस्थेकडून Grade - I ही पदवी प्राप्त केलेली असावी किंवा राष्ट्रीय/राज्य अग्निशमन सेवा महाविद्यालय यांच्याकडील पदवी (B.E. Fire) धारण केलेली असावी किंवा राष्ट्रीय / राज्य अग्निशमन सेवा महाविद्यालय यांच्याकडील Divisional Fire Officer पाठ्यक्रम (अग्निशमन अभियांत्रिकीमधील पदविका) धारण केलेली असावी किंवा कोणत्याही शाखेची पदवी प्राप्त केल्यानंतर The Institution of Fire Engineers (U.K.) यांचे सदस्यत्व प्राप्त केलेले असावे. तसेच केंद्र/राज्य/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या सेवेतील किमान उपमुख्य अग्निशमन अधिकारी या पदाचा किमान 03 वर्षाचा अनुभव अनिवार्य आहे. |
| 2 | मालमत्ता कर वसुलीसाठी स्थापन केलेल्या नियंत्रण कक्षामार्फत वसुली वाढविण्यास व नवीन योजनेच्या अंमलबजावणीसाठी सहाय्य करणे. | 01 | कर संबंधी काम केल्याचा शासन/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेतील समकक्ष पदाचा किमान 05 वर्षाचा अनुभव आवश्यक. वर्ग-2 चे निवृत्त अधिकारी आयकर विभाग/वस्तु आणि सेवा कर विभाग/कस्टम विभाग इत्यादी. |

**सर्वसाधारण अटी :-**

1. उपरोक्त नमूद विवक्षित कामासाठी अर्हता व संबंधित कामाचा अनुभव नमूद करण्यास आलेले आहे.(अर्जासोबत अनुभव प्रमाणपत्र अथवा सदर पदावरील आदेश व कार्यकाळ जोडावे.)

2. विवक्षित कामाचे स्वरुप आणि व्याप्ती विचारात घेऊन ते काम पूर्ण करण्याचा कालावधी निश्चित करुन देण्यात येईल. सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53(1) अन्वये एकावेळी जास्तीत जास्त सहा महिन्यासाठी देण्यात येईल. परंतू नियुक्तीस वाढीव कालावधीकरिता मुदतवाढ द्यावयाचे झाल्यास मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने पुढील कार्यवाही करण्यात येईल. तथापि,असा सर्व एकूण कालावधी तीन वर्षांपेक्षा अधिक असणार नाही.

3. सेवानिवृत्त शासकीय अधिकारी यांची विहित कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणूक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्यावेळी महागाई भत्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल.

4. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

5. असा सेवानिवृत्त अधिकारी वयाच्या 65 व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकेल.

6. असा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक,मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा. तसेच प्रस्तावित सेवेंसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

7. आपत्कालीन काळात रात्री-अपरात्री गरजेनुसार हजर राहून सर्व कामे करावी लागतील.

8. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडुन घेण्यात येईल. तसेच सदर नेमणूका करार पध्दतीने असून सदरील नेमणुकीमुळे कायम सेवेच कोणताही अधिकार प्राप्त होणार नाही. तथा या आशयाची मागणी राहणार नाही,असे हमीपत्र अधिका-याने सादर करणे बंधनकारक राहील.

9. अशा अधिका-याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसल्याबाबत संबंधित कार्यालयीन विभागाचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

10. नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याहीवेळी अशा अधिका-यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

11. असा अधिकारी त्याच्यावर सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल,अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.

12. अशा अधिकारी यांनी Conflict of Interest जाहीर करणे आवश्यक राहील.

13. अशा अधिका-यांना आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ते व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

14. अशा करार पध्दतीवरील अधिकारी यांनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

14. अशा करार पध्दतीवरील अधिकारी यांनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

15. नियुक्ती अधिकारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. तसेच महानगरपालिकेच्या गरजेनुसार आवश्यक कामे त्यांच्याकडे सोपवल्यास सदर कामे करणे बंधनकारक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्ती प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.

ठिकाण :- छत्रपती संभाजीनगर.
दिनांक :- 08 /07 /2024.

आयुक्त तथा प्रशासक
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

## अर्जाचा नमुना

प्रति,

मा.आयुक्त तथा प्रशासक
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

विषय – विवक्षित कामासाठी सेवानिवृत्त अधिका-यांची सेवा करार पध्दतीने घेणेबाबत.

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने मी विनंतीपूर्वक अर्ज करतो/करते की,मी सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय दि.17/12/2016 मधील अटी व शर्ती पूर्ण करीत असून वरील विषयात नमूद केलेल्या कामाच्या अनुषंगाने जाहिरातीमध्ये नमूद --------------------------------------------------------------------------------------------------------------काम करण्यास इच्छुक असून माझी खाली नमूद केल्यानुसार माहिती सादर करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | सेवानिवृत्त अधिका-याचे पूर्ण नांव | |
| 2 | पत्रव्यवहाराचा पत्ता/संपर्क दुरध्वनी /मोबाईल क्रमांक /Email ID | |
| 3 | सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद व विभाग | |
| 4 | शासकीय सेवेत आल्याचा दिनांक /शासकीय सेवेत आल्यापासून सेवानिवृत्ती पर्यंत धारण केलेली पदे व कार्यालय | |
| 5 | सेवानिवृत्तीचा दिनांक | |
| 6 | अर्जाच्या दिनांकास पूर्ण वय | |
| 7 | सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेले वेतन (संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र) | |
| 8 | अर्जदार सेवानिवृत्त अधिका-यांच्या विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित अथवा प्रलंबित नसल्याबाबतचे संबंधित विभागाचे प्रमाणपत्र | |
| 9 | विवक्षित कामाच्या अनुषंगाने प्रवास करावा लागल्यास तसे हमीपत्र सोबत जोडणे आवश्यक | |
| 10 | सद्यस्थितीत मिळत असलेले सेवानिवृत्तीवेतन (संबंधित कोषागार कार्यालयाचे प्रमाणपत्रासह) | |

स्थळ :-

दिनांक :- स्वाक्षरी